15 JUL 2025
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुरू-शिष्यात 'सह-अध्यायी' भूमिका अत्यावश्यक : डॉ. कृष्णा पाटील

कोल्हापूर, ता. १४ : 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये गुरू आणि शिष्य यांच्या नात्याला विशेष महत्त्व आहे. त्या दोघांमध्ये 'सह-अध्यायी भूमिका' अत्यंत गरजेची आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

या केंद्रातर्फे 'बदलत्या शैक्षणिक धोरणात गुरूचे स्वरूप' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी दूर व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे होते.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अभ्यासक्रम आणि अध्यापन पद्धती यामध्ये शिक्षक हा एक मुख्य स्तंभ मानला आहे. प्रत्येक गुरू हा शिक्षक असतो; पण प्रत्येक शिक्षक गुरू असतोच असे नाही. गुरू म्हणजे अज्ञानातून ज्ञानाकडे, अंधःकारातून प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ आहे. डॉ. संजय चोपडे यांनी स्वागत केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले.

15 JUL 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

फूड टेक्नॉलॉजी हे केवळ एक शैक्षणिक क्षेत्र नसून, मानवाच्या आरोग्याशी, अन्नसाखळीशी आणि जागतिक अन्न सुरक्षेशी जोडलेले महत्त्वाचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात उत्तम करिअरच्या संधी उपलब्ध असून, विद्यार्थ्यांचा कल दिवसेंदिवस वाढत आहे. फूड टेक्नॉलॉजी हे जागतिक स्तरावर प्रचंड मागणी असलेले क्षेत्र आहे. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युके आणि जर्मनीसारख्या देशांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांना शिक्षण, उत्पादन आणि फूड सेफ्टी क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

# फूड टेक्नॉलॉजीतून शंभर टक्के नोकरीची हमी

• अहिल्या परकाळे, कोल्हापूर

- शासनासह देश-विदेशातील नामवंत कंपन्यांमध्ये नोकरीची संधी
- फूड प्रोसेसिंग, इंजिनिअरिंग अन् तंत्रज्ञानाचा अभ्यासक्रम

फूड टेक्नॉलॉजी हा कुकिंग कोर्स नसून, सायन्स, इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजीचे मिश्रण आहे. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातील फूड अँड टेक्नॉलॉजी विभागाचे विद्यार्थी देश-विदेशातील नामवंत कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत. तसेच शासकीय अन्न व औषध प्रशासनातील विविध पदावर रूजू झाले आहेत. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शंभर टक्के नोकरीची हमी असल्याने विद्यार्थ्यांचा ओढा या अभ्यासक्रमाकडे वाढत आहे.

शिवाजी विद्यापीठात बी. टेक. फूड टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम २००८ पासून सुरू आहे. हा चार वर्षांचा अभ्यासक्रम असून प्रत्येक वर्गात ६० विद्यार्थी आहेत. सुरुवातीपासूनच या अभ्यासक्रमाला मागणी वाढत आहे. या अभ्यासक्रमात पदार्थ कसा तयार करायचा हे शिकवले जात नाही. तर फूड प्रोसेसिंगसह इंजिनिअरिंग आणि तंत्रज्ञान शिकवले जाते. एखादे प्रोडक्ट तयार करताना त्यामध्ये कोणकोणते घटक असले पाहिजेत, याचा अभ्यास केला जातो. फूड प्रोसेसिंग, डेअरी प्रोसेसिंग, मीट पोल्ट्री अँड एग्ज प्रोसेसिंग, ऑईल प्रोसेसिंग, चॉकलेट, बेकरी प्रोसेसिंग यासंदर्भातील तांत्रिक गोष्टी शिकवल्या जातात. खाद्य पदार्थांमधील कार्बोहायड्रेट्स, प्रोटिन्स, फॅट्स, मिनरल्स, व्हिटॅमिन्सचे महत्त्व आणि प्रमाण शिकवले जाते. फूड पॅकेजिंगमध्ये जास्तीत जास्त दिवस अन्न कसे टिकेल त्यासाठी काय केले पाहिजे यासंदर्भात मार्गदर्शन केले जाते.



त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमध्ये किंवा स्पर्धा परीक्षेतून सरकारी नोकरी मिळते. त्याचबरोबर अनेक विद्यार्थी स्वतःचे स्टार्टअप सुरू करून व्यवसाय करतात. जास्तीत जास्त विद्यार्थी परदेशी कंपन्यांमध्ये कार्यरत आहेत.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार कंपन्यांमध्ये ६ महिन्यांचे प्रशिक्षण बंधनकारक केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कंपनीच्या कामाची संपूर्ण माहिती मिळेल. शिवाय त्याच कंपनीत नोकरीची संधीदेखील मिळण्याची शक्यता असते. कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम तयार केल्याने विद्यार्थ्यांना नोकरी, व्यवसायाची शंभर टक्के हमी आहे. भारतात पिकणाऱ्या अन्नधान्यावर प्रक्रिया करून बदलत्या जीवनशैलीनुसार अन्न निर्मिती केली जाते. खाण्यापिण्याची पध्दती बदलल्याने नूडल्स, पास्ता, रेडी टू सर्व्ह, रेडी टू ड्रिंक फूड, रेडी टू इट अन्नपदार्थांमध्ये कोणकोणते घटक असले पाहिजेत, यावर विद्यार्थी अभ्यास करतात. काही विद्यार्थ्यांनी न्यूट्रिशनयुक्त चॉकलेट किंवा जेली तयार करण्यावर संशोधन केले आहे. अमेरिका, युरोप, थायलंड या देशांमध्ये अन्नप्रक्रिया करण्याचे प्रमाण ७० ते ८० टक्के आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातील जास्तीत जास्त विद्यार्थी परदेशात देशात काम करत आहेत. खरोखरच, अलीकडच्या काळात फूड टेक्नॉलॉजी (Food Technology) या क्षेत्राला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे.

## दोन्ही ग्रुपच्या विद्यार्थ्यांना प्रवेश

राज्य शासनाने यंदा पीसीएम आणि पीसीबी या दोन्ही ग्रुपच्या विद्यार्थ्यांना फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी विषयाला प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी प्रवेशाचा कटऑफ ९० टक्केपेक्षा जास्त असतो. नोकरी मिळण्याची खात्री असल्याने बारावीनंतर बी. टेक आणि पदवीनंतर एम.टेकला विद्यार्थी प्रवेश घेतात. आयसीटी मुंबईनंतर शिवाजी विद्यापीठातील फूड टेक्नॉलॉजी अव्वल मानले जाते.

**- डॉ. इराणा उडचाण**
(विभागप्रमुख, फूड टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ)

## कॅंपस इंटरव्ह्यूमधून नोकरीचे प्रमाण

| | |
|---|---|
| २०२०-२१ | ४० टक्के |
| २०२१-२२ | ६० टक्के |
| २०२३-२४ | ५० टक्के |
| २०२४-२५ | ६० टक्के |

महा
न्यूज व्ह्यूज





# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारकार्यावर शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज ):**

शिवाजी विद्यापीठात 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार आणि कार्य' या विषयावर येत्या १६ व १७ जुलै रोजी दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने परिषद आयोजित केली आहे. ही माहिती परिषदेचे समन्वयक गांधी अभ्यास केंद्राचे डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुनीलकुमार लवटे आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंडित टापरे यांनी दिली आहे.

अमेरिकेतील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक जोशी यांच्या हस्ते १६ जुलै रोजी सकाळी साडेदहा वाजता परिषदेचे उद्घाटन करण्यात येईल. यावेळी अमेरिकेतील शास्त्रज्ञ डॉ. अशोक खंडकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांच्या बीजभाषणाने परिषदेला प्रारंभ होईल. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी असतील.

प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल यांचेही १७ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता विशेष सत्रात मार्गदर्शन होईल.



उद्घाटनानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मयाचे संपादक प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे यांची मराठी विभागाचे प्रमुख डॉ . नंदकुमार मोरे आणि विचारशलाका नियतकालिकाचे संपादक डॉ. नागोराव कुंभार विशेष मुलाखत घेतील.

या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचार व कार्याच्या अनुषंगाने विविध नऊ सत्रांमध्ये चर्चा करण्यात येईल. अनेक दिग्गज तज्ज्ञ व अभ्यासक या अंतर्गत मांडणी करतील. यामध्ये विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष दिलीप करंबेळकर, प्रा. राजा दीक्षित, डॉ. रणधीर शिंदे, सर्फराज अहमद, डॉ. श्रीराम पवार डॉ. कौतिकराव ठाले-पाटील, 'साधना'चे संपादक विनोद शिरसाट, प्रख्यात गांधीवादी विचारवंत डॉ. विश्वास पाटील, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, श्रीनिवास हेमाडे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, ज्येष्ठ विचारवंत अशोक राणा, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर आदी सहभागी होणार आहेत.

या परिषदेच्या निमित्ताने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची पुस्तके, छायाचित्रे आणि चित्रफिती यांचे विशेष प्रदर्शनही राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात आयोजित करण्यात येणार आहे. तर्कतीर्थांविषयीच्या शोधनिबंधांचे विशेष सत्रही आयोजिले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप होईल. तरी या आंतरराष्ट्रीय परिषदेला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

महा न्यूज & व्ह्यूज




# गुरु आणि शिष्यामध्ये 'सह-अध्यायी' भूमिका अत्यावश्यक : डॉ. कृष्णा पाटील

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज ):**


राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये गुरु आणि शिष्य यांच्या नात्याला विशेष महत्त्व देण्यात आले असून, दोघांमध्ये 'सह-अध्यायी भूमिका' अत्यंत गरजेची आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

'बदलत्या शैक्षणिक धोरणात गुरुचे स्वरूप' या विषयावर केंद्राच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित ऑनलाईन विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दूर व ऑनलाइन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे होते.

डॉ. पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अभ्यासक्रम आणि अध्यापन पद्धती यामध्ये शिक्षक हा एक मुख्य स्तंभ मानला आहे. भारतीय ज्ञानप्रणालीमध्ये गुरुची भूमिका केवळ ज्ञानदाते म्हणून नव्हे, तर जीवनदृष्टी देणारे मार्गदर्शक म्हणूनही महत्त्वाची आहे. प्रत्येक गुरु हा शिक्षक असतो, पण प्रत्येक शिक्षक गुरु असतोच असे नाही. गुरु म्हणजे अज्ञानातून ज्ञानाकडे, अंध:कारातून प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ. गुरु ज्ञान, कौशल्य, अनुभव, वृत्ती, परिपक्वता आणि अभियोग्यता यामुळे मोठा असतो. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये 'गुण ग्राहकता' म्हणजेच श्रेष्ठ मूल्ये स्वीकारण्याची क्षमता विकसित केली पाहिजे. अनुभव, विचार आणि वृत्ती यांच्या समन्वयातूनच खरे 'गुरुपण' घडते.

डॉ. संजय चोपडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सचिन भोसले यांनी आभार मानले.

महा न्यूज & व्ह्यूज




# दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्र सुट्टी दिवशी राहणार सुरु

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज):**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची विविध अभ्यासक्रमाची प्रथम व द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे शनिवार दि.१२ जुलै व रविवार दि.१३ जुलै या सुट्टीच्या दिवशी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे मुख्य कार्यालय सुरू राहणार असल्याची माहिती प्र.संचालक डॉ.के.बी.पाटील यांनी दिली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ मधील बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास,) एम.कॉम.एम.एस्सी (गणित) एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) व एम.कॉम.एम.एस्सी (गणित) एम.बी.ए. (ऑनलाईन मोड ) या अभ्यासक्रमाचे प्रथम व द्वितीय वर्षाचे प्रवेश फॉर्म भरणेची प्रक्रिया सुरू आहे. या केंद्रामध्ये प्रवेश घेणारे बहुतांश विद्यार्थी नोकरी करून शिक्षण घेणारे असल्याने सुट्टी दिवशी प्रवेश घेणे, अभ्यासक्रमांची माहिती घेणे करिता या केंद्रामध्ये येत असतात. या कारणास्तव दूरशिक्षण ऑनलाईन शिक्षण केंद्राचे कार्यालय शनिवार दि.१२ जुलै व रविवार दि.१३ जुलै रोजी शासकीय सुट्टी दिवशी मुख्य कार्यालय सुरू राहणार आहे.

सदरची कार्यवाही दि.१५ सप्टेंबर पर्यत राबविण्यात येणार आहे. तरी विद्यार्थी, पालक, अभ्यागत व अभ्यासकेंद्र समन्वयक यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्र.संचालक यांनी डॉ.के.बी.पाटील केले आहे.